# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ठाणे महानगरपालिकेच्या नावे असलेल्या जागेचा भूखंडाचा सातबारा न कळविता परस्पर म्हाडाच्या नावे केल्याबाबत

**(१) २०७३१ (१०-०८-२०१५). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या नांवे ७ हजार २०० चौ.मी. जागेचा भूखंडाचा सातबारा महानगरपालिकेला न कळविता परस्पर म्हाडाच्या नावे केल्याचा प्रकार माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :** (१), (२) व (३) मौज चितळसर मानपाडा ता.जि.ठाणे येथील गट नं. ५९ अ हिस्सा नं. २ ग/१ क्षेत्र ७२८४.२८ चौ.मी हा ठाणे महानगरपालिकेच्या नावे असलेल्या जमिनीचा गाव नमुना नंबर ७/१२ ठाणे महानगरपालिकेला न कळविता परस्पर म्हाडाच्या नावे करण्यात आल्याबात अतिरिक्त महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि. १९/०९/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे. मौजे चितळसर मानपाडा येथील फेरफार क्रमांक ९१५ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्यो नावे रस्त्यासाठी असलेले ७२८४.२८ चौ.मी, क्षेत्र ठाणे महानगरपालिकेला न कळविता म्हाडाच्या नावे करण्यात आलेले आहे. फेरफार क्रमांक ९१५ नोंदविताना सकृतदर्शनी अनियमितता झाल्याने सदरचा फेरफार पुनर्विलोकनात घेण्याचा प्रस्ताव तहसिलदार, ठाणे यांनी दि.१६/११/२०१५ च्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर केला असून त्याची सुनावणी उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे चालू आहे.

---

**तलासरी व डहाणू (जि.पालघर) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.८ चे चौपदरीकरणाबाबत**

**(२) २५७९४ (०७-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी व डहाणू (जि.पालघर) येथील राष्टीय महामार्ग क्र.८ चे चौपदरीकरण दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१० रोजी नोटीस देऊन जमिनी संपादन करण्यात आली असता त्याचा मोबदला सन २०१५ मध्ये रु.८०७/- व रु.८६७/- प्रति चौरस मीटर देण्यात आला असता तो ही वसई, घोडबंदर, मुंबई येथील दर व या ठिकाणच्या दरामध्ये तफावत असल्याने जमीन मालकांवर झालेल्या अन्यायामुळे शासनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे असे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसई, घोडबंदर, मुंबई येथील दर व तलासरी व डहाणू तालुक्यातील जमीन दरामधील तफावतीचे कारणे काय,

(३) असल्यास, सदरची जमीन संपदान दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१० रोजी झाली असता त्याचा मोबदला अति तुटपुंजी सन २०१५ मध्ये देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) जमीनीचे मुल्यांकन हे जमीनीचे स्थान, क्षेत्र, विकसन क्षमता, औद्योगीक क्षमता व दळणवळण क्षमता, इ.अनेक बाबींवर अवलंबून असते, त्यामुळे वसई, घोडबंदर, मुंबई येथील दरात व तलासरी आणि डहाणू, जि.पालघर येथील दरात स्थानपरत्वे तफावत स्वाभाविक आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द-शिवाजी नगर (मुंबई उत्तर पूर्व) नागरी प्रभागात**
**विजेचे उपकेंद्रे स्थापित करण्याबाबत**

**(३) २८५५२ (२३-१२-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द-शिवाजी नगर (मुंबई उत्तर पूर्व) नागरी प्रभागात विजेचे उपकेंद्रे स्थापित करण्यासाठी संबधित प्राधीकार्यांकडून उपकेंद्र संस्थापित करण्याबाबतची मागणी स्थानिक जनप्रतिनिधी, विविध रहिवाशी संघाचे पदाधिकारी, विशेष करून महिला, वृद्ध नागरिक शाळकरी विद्यार्थी व त्यांचे पालक वर्ग यांनी मा. मुख्यमंत्री, मंत्री (महसूल), मंत्री (उर्जा), मंत्री (सार्वजनिक बांधकाम), राज्यमंत्री (नगरविकास), राज्यमंत्री (पर्यावरण), राज्यमंत्री (वने), प्रधान

सचिव (महसूल-पुनर्वसन), (वने), (सा.बां), (उर्जा), तसेच संबधित महापालिका (पूर्व उपनगरे), आयुक्त, संबधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संबधित जिल्ह्यांचे उपविभागीय महसूल अधिकारी (प्रांत) यांनी सन २०१० ते आजतागायत पर्यंतच्या प्रकरणी लेखी निवेदनाद्वारे कार्यवाहीची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई पूर्व उपनगरे यांच्याकडे नस्ती क्र. जमीन/२०१४/प्र.क्र. १४२ ज ३ आणि नगरविकास विभागाकडील सीआरझेड (फ), टी.सी. ४, यांच्याकडे माहे ऑक्टोंबर २०१५ पावेतो प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) याबाबत प्रधान सचिव (महसूल) यांनी दि.३०.७.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सर्व संबंधितांसह वीज उपकेंद्रासाठी मागणी केलेल्या जमिनीची स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) शहरालगत असलेल्या शासनाच्या जमीनी नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्याबाबत

**(४) २८९४८ (२३-१२-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहरालगत असलेली सर्व्हे नं.१६६/५ मधील ७७.५९.१० हेक्टर शासनाची जमीन शहराचा वाढता विस्तार व लोकसंख्या यासाठी विकास कामे करता यावीत व नागरिकांना सुविधा पुरविता याव्यात म्हणून अंबरनाथ नगरपरीषदेने भाजी मार्केट, स्मशान भूमी, दफन भूमी, खेळाची मैदाने, ग्रीन गार्डन प्राथमिक व माध्यमिक शाळा, प्रसूती गृह, दवाखाने, पोलीस स्टेशन इत्यादीसाठी सदर जागा नगरपरीषदेला मिळावी असा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच अनुषंगाने अंबरनाथ स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १४ जूलै,२०१५ रोजी वा त्यासुमारास मा .महसुल मंत्री यांना शासकीय जमीन नगरपरीषदेच्या मागणीनुसार मंजूर करावी असे निवेदन दिले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर मा. महसुल मंत्री व प्रधान सचिव, महसुल यांना अहवाल सादर करण्याबाबत लेखी निदेश दिले त्यानुसार प्रधान सचिव, महसुल यांनी याबाबतचा अहवाल तयार करून मा.मंत्री महोदयाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे हे खरे आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६):** (१), (२), (३) व (४) मौजे अंबरनाथ ता.अंबरनाथ जि.ठाणे येथील स.नं. १६६ पै मधील मंजूर विकास योजनेतील विविध आरक्षण व नियोजित रस्त्याखालील शासकीय जमीन सार्वजनिक कामासाठी नगरपरिषदेच्या ताब्यात घेण्याबाबत अंबरनाथ नगरपरिषदेने दिनांक १३/०२/२००९ च्या सर्वसाधारण सभेत ठराव पारीत केला आहे. तसेच मौजे अंबरनाथ येथील स.नं. १६६/५ मधील क्षेत्र ७७-५९.१० हे. आर. जमीन अंबरनाथ नगरपरिषदेला देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. १४/०७/२०१५ च्या निवेदनान्वये शासनाकडे केली आहे.

प्रारुप अथवा अंतिम विकास आराखड्यातील आरक्षण विकसित करण्यासाठी शासकीय जमीन आवश्यक असेल, अशी जमीन संबंधित नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना प्रदान करण्याचे अधिकार शासन अधिसूचना दि. ३१/१२/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे निर्देश शासन पत्र दिनांक २४/०६/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांना दिले आहेत.

---

## म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील गिरिजादेवी संस्थान परिसरात पसरलेल्या अस्वच्छतेबाबत

**(५) २९०१४ (२१-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील थंड हवेचे ठिकाण असलेले व पर्यटकांचे आकर्षण स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेले जाज्वल्य देवस्थान गिरिजादेवी संस्थान या परिसरात पसरलेल्या घाणीच्या साम्राज्याबाबत भाविकांनी व नागरिकांनी अनेक वेळा तहसीलदार, खुलताबाद यांच्याकडे लेखी तक्रार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरिजादेवी संस्थान मंदिराचे अध्यक्ष, तहसीलदार तथा दंडाधिकारी खुलताबाद यांनी तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१६):** (१) व (२) म्हैसमाळ, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथील नागरिकांनी दि.०९.०९.२०१५ रोजी तहसिलदार, खुलताबाद यांच्याकडे श्री.गिरजा देवी मंदीर परिसरातील अस्वच्छतेबाबत तक्रार केली आहे. श्री.गिरजा देवी मंदीर, म्हैसमाळ या प्राचीन मंदिराचा उत्कर्ष व्हावा म्हणून मंदिराचे बांधकाम करण्यात येत होते. बांधकामावेळी बांधकामासाठी लागणारे साहित्य मंदीर परिसरात पडलेले होते. डिसेंबर, २०१५ नंतर सदर बांधकाम साहित्य हलविण्यंत आले आहे. तसेच भाविकांच्या तक्रारी नंतर लगेच श्री.गिरजा देवी मंदीर ट्रस्ट च्या सर्व विश्वस्थांची बैठक घेण्यात येऊन मंदीर परिसरात स्वच्छता करण्यात आली असून परिसरात हॉटेल चालक व नारळ विक्रेत्यांना मंदीर परिसरात कचरा न टाकण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उपग्रहाद्वारे जमीन मोजणीच्या प्रस्तावाबाबत

**(६) २९०२० (०८-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपग्रहाद्वारे जमीन मोजणीचा प्रस्ताव गेल्या वर्षभरापासून पडून असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपग्रहाद्वारे जमीन मोजणीचा प्रस्ताव जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून वर्षभरापूर्वी मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून सदर प्रस्तावास मंत्री मंडळाची मंजुरी मिळाली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंत्री मंडळाची मंजुरी मिळाली असतांना हा निधी उपलब्ध करण्यास कोणत्या अडचणी येत आहेत,

(४) असल्यास निधी उपलब्ध करून देण्याची तत्काळ कार्यवाही करणार आहे का वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६):** (१),(२),(३),(४) व (५) संपूर्ण राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी करण्याच्या प्रकल्पास मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी व नकाशांचे डिजिटायझेशन करण्याबाबतचा शासन निर्णय दि.०६.१०.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत पहिल्या टप्प्यात राज्याच्या प्रत्येक महसूली विभागातील एक जिल्हा याप्रमाणे ६ जिल्ह्यांमध्ये ग्रामीण भागातील जमिनींच्या पुनर्मोजणीची कार्यवाही करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच सदर सहा जिल्ह्यातील जमिनींची पुनर्मोजणी व नकाशांचे डिजिटायझेशन या करीता अनुक्रमे रु २५४.८२ कोटी व रु.३८.७९ कोटी एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पामध्ये पुनर्मोजणीसाठी एकूण रु.९.३३ कोटी व भू नकाश्यांच्या डिजीटायझेशनसाठी एकूण रु.४.८६ कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

---

## आगामी वर्षातील रेडीरेकनरचे दर ठरविण्यासंदर्भात मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक

**(७) ३५१०० (२३-१२-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगामी वर्षातील रेडीरेकनरचे दर ठरविण्यासंदर्भात दिनांक ७/१०/२०१५ रोजी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम क्षेत्रातील मंत्री आणि मुंबईत विक्रीविना पडून असलेली लाखो घरे यामुळे यावर्षी रेडीरेकनर दरात वाढ करु नये अशी आग्रही मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधींनी सदर बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६):** (१) होय.
(२) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मा.लोकप्रतिनिधी यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर वाढवून नयेत, सर्वसाधारण वाढ १० टक्के असावी, ८०० चौ.फूटावरील सदनिकांचे दर वाढवावेत इ. संमिश्र सूचना केलेल्या आहेत.
(३) व (४) महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निर्धारीत करणे) नियम १९९५ अन्वये वार्षिक मूल्य दर तक्ते तयार करण्यात येतात. उक्त नियमातील तरतूदी, वर्षात नोंदविले गेलेले खरेदी विक्री व्यवहारांचे सरासरी दर, संबंधित गेलेले खरेदी विक्री व्यवहारांचे सरासरी दर, संबंधित मूल्यविभागाचे गुणदोष, बाजारातील प्रचलित दर, मालमत्तांचे प्रदर्शनामधील दर, स्थानिक चौकशी इ. बाबींची पडताळणी करुन दर सुधारित करण्यात येतात. सन २०१६-१७ करिताचे मूल्य दर तक्ते नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यंचेकडून दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

---

**ऑनलाईन पध्दतीने सातबारा व ८-अ उतारे सदोष व चुकीचे निघत असल्याबाबत**

**(८) ३९७३३ (२०-०४-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर(इचलकरंजी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर(कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात राज्य शासनाच्या आदेशानुसार सुरू केलेल्या सातबारा व ८-अ उतारे ऑनलाईन पध्दतीने देण्याच्या योजनेत अनेक उतारे सदोष व चुकीच्या पध्दतीने वितरीत केल्याची बाब माहे जानेवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-म्युटेशन पध्दतीमुळे नोंदणी कार्यालयात नोंदणी पुर्ण होण्याकरिता सध्या अस्थित्वात असलेले खाते उतारे गाव कामगार तलाठी यांनी चुकीच्या पध्दतीने भरल्यामुळे हस्त लिखीत उतारे व ऑनलाईन उतारे यामध्ये तफावत आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदोष उताऱ्यांमुळे तफावत येत असल्याने ई-म्युटेशन पध्दतीस स्थगिती देवून पुर्वीचीच नोंदणी पध्दत सुरू ठेवण्याची मागणी हातकणंगले तालुक्यातील वकील व मुद्रांक विक्रेते यांनी शासनाकडे माहे जानेवारी २०१६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०९-२०१६):** (१) हस्तलिखीत गा.न.नं. ७/१२ मधील नोंदींची पडताळणी करुन त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास संगणक आज्ञावलीचा वापर करुन त्या दुरुस्त करुन गा.न.नं.७/१२ उतारे वितरीत करण्याची कार्यवाही संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात सुरु आहे.

(२), (३), (४), (५) व (६) अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणीकरण करुन ई-फेरफार प्रणालीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा निर्णय शासनाने दि.२३.१०.२०१३ रोजी घेतला आहे. त्यानुषंगाने ई-फेरफार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील येणाऱ्या अडचणी विचारात घेवून राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राकडून "ई-फेरफार आज्ञावली व्हर्जन-२" विकसित करुन ती वापरास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्हजनच्या आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळण्याकरिता महसूल व वन विभागाच्या दि.७ मे, २०१६ शासन परिपत्रकान्वये एडीट मोडयुल उपलब्ध करून देण्यात आले असून संगणकीकृत गा.न.न.७/१२ मधील तपशील हस्तलिखित गा.न.न.७/१२ प्रमाणे तंतोतत जुळविण्याची कार्यवाही अविलंब करण्याच्या सूचनाही सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

दरम्यानच्या काळात, खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना आवश्यक असल्यास, केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनाकरीता एक विशेष बाब म्हणून दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत हस्तलिखित गा.न.नं.७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदान करण्यात आली होती. तसेच जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत अशा भागात मंडळ स्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह "ई-फेरफार वर्कस्टेशन्स" स्थापन करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

ई-फेरफार कार्यक्रमासाठी शासनाने स्टेट डाटा सेंटरवर अधिकचे स्टोरेज उपलब्ध करुन दिले आहे. या सर्व उपाययोजनांमुळे ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीतील बहुतांश अडचणींचे निराकरण झाले आहे. "ई-फेरफार" व "ई-चावडी" या दोन्ही प्रणालीचे प्रकल्प राज्यशासनाचे महत्वाकांक्षी प्रकल्प असून दोन्ही प्रकल्प यशस्वी करण्यासाठी शासनाकडून कृतीशील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नाशिक येथे कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करणेबाबत**

**(९) ४०७९९ (२७-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्याकरिता उद्योग संचालनालयाला जागा हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१६ पर्यंत महसूल विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर केंद्रासाठी उद्योग संचालनालयाने शासनास ६० कोटीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केलेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६):** (१) नाशिक येथे आंतरराष्ट्री दर्जाचे औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्रासाठी उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या जागा मागणीच्या पत्राच्य अनंषगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दिनांक २/३/२०१६ रोजी उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक व उक्त जागा मागणी प्रकरणी अभिप्राय/ना हरकत दाखले आवश्यक असलेल्या सर्व संबंधितांची एकत्रित बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत विशेष हेतु वाहन संस्थेस (SPV) जागेच्या मोजणी संदर्भात फी भरणेबाबत कळविण्यात आले आहे. संबंधित विशेष हेतू वाहन संस्थेने मोजणी फी भरल्यानंतर जागेची मोजणी करण्याचे नियेजित आहे.

(२) नाही. विशेष हेतु वाहन संस्था मे. नाशिक इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, नाशिक यांनी नाशिक येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र उभारण्यासंदर्भात उद्योग सह संचालक, नाशिक यांच्या मार्फत रु.३६८.१० कोटी रकमेचा प्रस्ताव उद्योग संचालनालयास सादर केला होता. तथापि रु.५०.०० कोटीच्या मर्यादेतील प्रस्ताव सादर करणेबाबत उद्योग संचालनालयाने उद्योग सहसंचालक नाशिक विभाग, नाशिक यांना कळविले आहे. सुधारीत प्रकल्प किंमत रु.५०.०० कोटीच्या मर्यादेतील सविसतर प्रकल्प अहवाल विशेष वाहन हेतु संस्थेडून अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा-कागल या कोल्हापूर मार्गावरील टोल वसुलीत होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१०) ४१००५ (२९-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा - कागल या कोल्हापूर मार्गावरील टोल वसुलीत प्रकल्पाचा खर्च, वाहनांची संख्या, एकूण टोल वसुली रक्कमेमध्ये विसंगती आढळून येत असून, टोल वसुलीत मोठा गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०१५ मध्ये टोल वसूल करणाऱ्या कंपनीने प्रतिदिन ९ हजार ४८६ वाहने प्रवास करतात असे दाखवले आहे तर एका सर्व्हे कंपनीने प्रतिदिन सुमारे २५ हजार वाहने प्रवास करतात असा अहवाल दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१०-२०१६):** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील कल्याण येथील आगरी समाज भवनची इमारत उभारण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(११) ४११५३ (२०-०४-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील मिळालेल्या शासकिय भूखंडावर आगरी समाजाचे आगरी समाज भवनाची इमारत उभारण्यासाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०१४ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री याच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदर तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण यांनी मतदार संघामध्ये मिळालेल्या शासकीय भूखंडाची यादी शासनाकडे दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासकीय मिळालेला भूखंड आगरी समाजाकरिता आरक्षित करण्यात आला आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६):** (१), (२), (३) व (४) कल्याण ग्रामीण परिसरात आगरी भवनाकरीता शासकीय भूखंड मिळण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०१/१२/२०१४ च्या निवेदनान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली असून सन्माननीय सदस्यांच्या विनंतीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश शास पत्र दि.२७/०१/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आले आहेत.

उक्त निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, कल्याण यांच्या दि.१३/०५/२०१५ च्या पत्रान्वये वाटपास निर्बाध्यरित्या उपलब्ध शासकीय जमिनीची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आवश्यक जमीन मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**कळमनूरी (जि. हिंगोली) तालुक्यातील दिग्रस बु येथील शेतकऱ्यांना आपल्या शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता मिळण्याबाबत**

**(१२) ४१३३५ (२०-०४-२०१६).डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी (जि. हिंगोली) तालुक्यातील दिग्रस बु येथील शेतकऱ्यांना आपल्या शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता मिळण्यासाठी रेडगाव, दिग्रस बु या दोन गावाच्या असलेल्या सिमारेषेवर झालेले अतिक्रमण कळमनूरी प्रशासनाने काढून टाकण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत झालेले अतिक्रमण काढुन टाकण्यात न आल्याने दिग्रस बु. येथील शेतकरी अरविंद करपे यांनी दि. ४ नोव्हेंबर २०१५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने केलेले अतिक्रमण काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१६):** (१) व (२) होय.
(३) व (४) मौ.डिग्रस बु. व मौ.रेडगाव, ता.कळमनूरी, जि.हिंगोली या दोन्ही गावांदरम्यान भूमी अभिलेख कार्यालयाकडील नकाशावरुन शीव दिसून येते. परंतु प्रत्यक्षात शीव रस्त्याच्या खुणा जायमोक्यावर आढळून येत नाहीत. काल्पनिक खुणांच्या आधारे रस्ता निर्माण करुन दिल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे तहसिलदार कळमनूरी यांनी दि.१२.०१.२०१६ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये उक्त दोन्ही गावांच्या शीवेला लागून असलेल्या शेतकऱ्यांनी स्वत:च्या शेतजमिनीची मोजणी करावी, मोजणी नंतरच शीव निश्चित होईल व त्यानंतरच संबंधितांना शीवेवरुन रस्ता उपलब्ध करुन देता येईल असे सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सारोळे (ता.भोर, जि.पुणे) येथील नदीच्या पूलाच्या दुरुस्तीबाबतचे कामकाज तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या सहापदरीकरणाचे काम अंतीमत: पूर्ण होईपर्यंत टोल आकारणी बंद करण्याबाबत**

**(१३) ४२३४२ (२९-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सारोळे, (ता.भोर, जि.पुणे) येथील नदीच्या पूलाच्या दुरुस्तीबाबतचे कामकाज तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या सहापदरीकरणाचे काम अंतीमत: पूर्ण होईपर्यंत टोल आकारणी बंद करणे शासनाच्या विचारधीन होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर शासनाचा पूर्णत: विचार झाला आहे काय, असल्यास यावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६):** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या अकार्यक्षम कार्यशैलीबाबत**

**(१४) ४४७५० (२९-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या अकार्यक्षम कार्यशैलीबाबत तक्रार वजा निवेदन मंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१६ च्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेमध्ये गैरहजर राहून गैरवर्तणुक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाकडून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.दिनांक १५ जानेवारी २०१६ रोजी अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,अकोला यांना अत्यंत महत्वाच्या अर्थसंकल्पिय बैठकीकरीता मुख अभियंता,सर्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,अमरावती येथे उपस्थित राहणे आवश्यक होते.तसेच कार्यकारी अभियंता, सा,बां, विभाग,अकोला हे पायाच्या आजारामुळे व त्यांना पायी चालणे शक्य नसल्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकी मध्ये त्यांना उपस्थित राहता आले नाही.त्याऐवजी उपविभागीय अभियांता सा.बां.उपविभाग, आकोला क्र.१ यांना बैठकी करिता उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या व ते सदर सभेस हजर होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**गार्डी (ता.खानापूर, जि.सांगली) येथील गट नं. ५४८ या जमिनीचे बेकायदेशीररित्या बिगर शेती केल्याबाबत**

**(१५) ४५३४० (२०-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गार्डी (ता.खानापूर, जि.सांगली) येथील गट नं. ५४८ या जमिनीचे बेकायदेशीररित्या बिगर शेती केली असल्याचे मौजे ग्रामपंचायत गार्डी यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार याप्रकरणी संबंधित दोषीं असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) ग्रामपंचायत गार्डी यांनी दिलेल्या दि.३१.१२.२०१५ च्यानिवेदनाची प्रत विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयात आढळून आली नाही. तथापि, जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून दि.१७/०६/२०१६ रोजी सदर निवेदनाची छायांकित प्रत विभागीय आयुक्त, पुणे यांनी उपलबध करुन घेतली आहे.

(२) मौज गार्डी येथील गट नं. ५४८ मधील अनधिकृत वापरात बदलाबाबतचा तहसिलदार, खानापूर (विटा) यांचेकडील दि.१८.०२.२०१५ रोजीचा आदेश सकृतदर्शनी सदोष आढळलेने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५७ अन्वये त्याचे पुनरीक्षण करुन उपविभागीय अधिकारी, विटा यांनी दिनांक ०६.०४.२०१५ च्या अदेशान्वये उक्त आदेश रद्द केलेला आहे. तथापि, अपर जिल्हाधिकारी, सांगली यांनी त्यांचेकडील अपिलात दि.१३.५.२०१५ च्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, विटा यांचा उपरोक्त दिनांक ०६.४.२०१५ रोजीचा निर्णय रद्द केला आहे.

(३) अपर जिल्हाधिकारी, सांगली यांनी पारित केलेला दिनांक १३.०५.२०१५ रोजीचा उक्त आदेश पुनरीक्षणात घेण्याचे निदेश जिल्हाधिकारी, सांगली यांना विभागीय आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २१.०६.२०१६ च्या पत्रान्वये दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुर्ला-अनंतपूर-गोधणी (ता.झरी, जि.यवतमाळ) या रस्त्याच्या बांधकामासाठी जमीन संपादित करण्यात येऊनही जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(१६) ४८१४७ (२९-०४-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुर्ला-अनंतपूर-गोधणी (ता.झरी, जि.यवतमाळ) या रस्त्याच्या बांधकामासाठी १५ वर्षांपूर्वी जमीन संपादित करण्यात आली असून सदरहू जमिनीचा मोबदला अद्यापही सार्वजनिक बांधकाम विभागाने शेतकऱ्यांना दिला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५ वर्षे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शेतकऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा करुन, आंदोलने करुनही त्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना अद्यापही संपादित जमिनीचा मोबदला न देण्याची कारणे काय,

(४) असल्यास, या शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) भुसंपादन प्रकरणात अंतिम निवाडा पारीत झाल्यावर मोबदला रक्कम अदा करण्यात येणार आहे.
(४) या प्रकरणात नवीन भुसंपादन कायदा २०१३ अन्वये कार्यवाही सुरु आहे. कार्यवाही पुर्ण होताच शेतकऱ्यांना मोबदला वाटप करण्यात येणार आहे.

---

**आटपाडी (जि.सांगली) तहसिल कार्यालयातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(१७) ४८५४३ (२०-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) तहसिल कार्यालयात तहसिलदाराचे पद माहे जानेवारी, २०१६ पासून नायब तहसिलदारांची ३ पदे गेल्या २ वर्षापासून,लिपीकाच्या ११ पदापैकी ३ पदे आणि १८ तलाठी पदापैकी ३ पदे तसेच गेल्या ६ महिन्यापासून वाहन चालकाचे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही पदे रिक्त रहाण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, रिक्त असलेली पदे केव्हा भरण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१६) :**(१), (२) व (३) तहसीलदार आटपाडी हे पद रिक्त नाही.

नायब तहसीलदार संवर्गातील मयत झाल्यामुळे १ पद व स्वेच्छानिवृत्तीमुळे १ पद अशी एकुण २ पदे रिक्त आहेत. अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांना नायब तहसीलदार संवर्गात पदोन्न्ती देणेबाबत विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.२९.०४.२०१६ रोजी घेण्यात आली असून निवडसूचीतील पात्र कर्मचाऱ्यांना नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नती देऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तहसील कार्यालय, आटपाडी येथे लिपीक संवर्गातील ११ पदे मंजूर असून सद्यस्थितीत ९ पदे कार्यरत असून ०२ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ४१/अर्थ-१ दि.०२.०६.२०१५ अन्वये सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकुण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्याची तरतूद असल्याने सदरची पदे रिक्त आहेत.

तलाठी संवर्गातील २ कर्मचाऱ्यांना मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती मिळाल्यामुळे व एका कर्मचाऱ्याने राजीनामा दिल्यामुळे ३ पदे रिक्त आहेत. तसेच, १ कर्मचारी दि.१०.०५.२०१६ रोजी निलंबित आहे. तलाठी पदभरतीच्या कार्यक्रमामधून सदरची रिक्त पदे भरण्याचे नियोजन आहे.

वाहन चालकाचे बदलीने १ पद रिक्त आहे. नियतकालिक बदली/पदोन्नतीने सदरचे पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील जमिनीची खरेदी विक्री व्यवहारामध्ये सन २०१६ या आर्थिक वर्षातील बाजारमुल्य दरात वाढ करु नये याबाबत केलेली मागणी**

**(१८) ४८९५६ (२०-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील जमिनीची खरेदी विक्री व्यवहारामध्ये सन २०१६ या आर्थिक वर्षातील बाजारमुल्य दरात वाढ करु नये अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सह निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी औरंगाबाद व जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे अनुक्रमे माहे १५ ऑक्टोबर, २०१५ व माहे ३१ नोव्हेंबर, २०१५ रोजी लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने केलेल्या मागणीवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधींची दिनांक ३०/११/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(३) व (४) मुंबई मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम १९९५ च्या नियम ४ मधील पोटनियम ३ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार, सन २०१६ चे वार्षिक मूल्य दर तक्ते दिनांक ३१/३/२०१६ पर्यंत कायम ठेवण्यात आले होते.

सन २०१६-१७ साठीचे वार्षिक मूल्य दर तक्ते दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी निर्गमित होऊन अंमलात आले असून त्यामध्ये लोकप्रतिनिधींच्या सूचना, बाजारातील मंदी, राज्यातील दुष्काळी परिस्थिती इत्यादीचा विचार होऊन औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मूल्य दरात सरासरी ५% इतकी माफक दरवाढ केली आहे.

---

**गायी, म्हशीने जास्त दुध द्यावे, यासाठी, बहुतांश पशुपालक आपल्याकडील दुभत्या जनावरांना ऑक्सीटोसीनचे इंजेक्शन देत असल्याबाबत**

**(१९) ४९३१८ (२०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गायी, म्हशीने जास्त दुध द्यावे व दुध काढताना सुलभता व्हावी यासाठी, बहुतांश पशुपालक आपल्याकडील दुभत्या जनावरांना ऑक्सीटोसीनचे इंजेक्शन देतात, मात्र या इंजेक्शनचा, दुधावर घातक परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात या प्रकाराला आळा घालण्यासाठी कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर: (२२-०८-२०१६) :**(१) हे खरे नसून अशा प्रकारची घटना घडल्याने विभागाच्या निदर्शनास आलेले नाही किंवा या संदर्भात तक्रारी / निवेदन प्राप्त झालेले नाहीत.
(२) ऑक्सिटोसीन हे संप्रेरक असून याची दुधाळ जनावरे पान्हावण्यास मदत होते. सदर इंजेक्शनचा गैरवापर होऊ नये म्हणून पशुसंवर्धन विभागातील सर्व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना शेतक्यांना सदरचे इंजेक्शन खरेदी करण्यासाठी चिठ्ठी (Prescription) देण्यात येऊ नये, अशा सुचना दिलेल्या आहेत. तसेच, पशुवैद्यकीय दवाखान्यांना आवश्यक असणाऱ्या औषधींचा विभागाच्या स्तरावरुन भावबंद करार करताना त्यामध्ये ऑक्सीटोसीन भावबंद इंजेक्शनचा समावेश नसल्याने त्याची खरेदी केली जात नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अतिरिक्त मुद्रांक शुल्क १ टक्का अधिभाराची रक्कम महापालिकेकडे परस्पर वर्ग करणेबाबत महापौरांनी मुख्यमंत्री यांच्याकडे दिलेले निवेदन

**(२०) ४९३७४ (२०-०४-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिरिक्त मुद्रांक शुल्क १ टक्का अधिभाराची रक्कम महापालिकेकडे परस्पर वर्ग करणेबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या तत्कालिन महापौरांनी दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेवून निवेदन देण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दिलेल्या निवेदनावर अद्यापही कोणतीही कारवाई झाली नसल्याने महापौरांनी व स्थानिक लोकप्रिनिधींनी नोव्हेंबर, २०१५ रोजी या याप्रकरणी पुन्हा मा.मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून १ टक्का अधिभाराची रक्कम वर्ग होण्यासाठी होत असलेला विलंब टाळण्यासाठी शासनाकडून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदर १ टक्का अधिभार निधी वितरीत न करता तालुका निबंधक स्तरावर वेळोवेळी महानगरपालिकेकडे वर्ग करुन वितरीत करण्यासंबंधीची मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास भाग २ मधील मागणी संबंधी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दिनांक ३/२/२०१६ च्या पत्रान्वये श्री.हितेंद्र ठाकूर, विधानसभा सदस्य यांना स्थानिक संस्था कर नियमानुसार कर जमा करण्याची व वितरणाची कार्यवाही करण्यात येत असल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत**

**(२१) ५०६०५ (२०-०४-२०१६). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचार्यांना निवृत्ती वेतन देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सेवानिवृत्त कर्मचारी कल्याण सेवा संघातर्फे करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय
(२) असल्यास, कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत क्र-६२४ दिनांक ३१ डिसेंबर, १९९६ मध्ये ठराव करुन तो पुढील कार्यवाहीसाठी पाठविला होता हे खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे १ एप्रिल, १९७४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेत सामावून घेण्यात यावे व प्रत्यक्षात अमंलबजावणी १ एप्रिल, १९९३ पासून करण्यात यावी तसेच तत्कालीन ऊर्जामंत्री यांनी सुध्दा २७ जुलै, २००१ ला विधानसभेत वीज मंडळ कर्मचाऱ्यांना निवृत्तवेतन योजना मंजुर करण्यात येत आहे अशी घोषणा केली होती हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही हे खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) तत्कालीन मा.ऊर्जा मंत्री यांनी अशा प्रकारची घोषणा केलेली नाही. परंतु आश्वासन दिले होते.
(४) निवृत्ती वेतन योजनेची व्यवहार्यता पडताळणी करण्यासाठी संचालिका (वित्त) म.रा.वि.म. सुत्रधारी कं.मर्या. यांच्या अध्यक्षतेखाली तिन्ही कंपन्यांचे संचालक (वित्त) व कार्यकारी संचालक (मा.सं.) यांची समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यभरात प्रलंबित मागण्यांसाठी मोर्चा काढल्याबाबत**

**(२२) ५११५४ (२०-०४-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यभरात त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी माहे २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे काढण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा मोर्चा महाविरण कंपनीचे पाच विभागात विभाजन करण्याच्या निर्णयाविरोधात व विज कर्मचाऱ्यांच्या धोरणात्मक प्रश्न सोडविण्यासाठी काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागण्या संदर्भात शासनाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ५२२ दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५, प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ हे मागासवर्गीयांच्या संविधानिक हक्कांच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांच्या विरोधात असून सुधारित परिपत्रक काढण्यात यावे अशी मागणी करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर परिपत्रकात पेन्शन योजना लागू करावी, निवड पदांमध्ये मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेमध्ये सवलत देण्यात यावी अशा प्रकारच्या मागण्या देखील करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,

(६) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने मागण्यांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०९-२०१६)** :(१) दि. २९.१२.२०१५ रोजी मोर्चाचे आयोजन केल्याबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना यांनी महावितरण कंपनीस दि. १४.१२.२०१५ रोजी निवेदन दिले होते.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) व (६) महावितरण कंपनीस्तरावर विहित कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात दुग्ध प्रकल्प, दापचरी येथे मोठे-मोठे बंगले व फार्म हाऊस बांधून अधिकारी व विकासक यांनी भाडेतत्तावार दिले असल्याबाबत

**(२३) ५१२७० (२०-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात दुग्ध प्रकल्प, दापचरी येथे मोठ-मोठे बंगले व फार्म होऊस बांधून अधिकारी व विकासक यांनी भाडेतत्तावार दिले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भाडे शासनाकडे जमा करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने बांधकाम करणाऱ्यां अधिकारी व विकासक यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२५-०७-२०१६) :**(१) दुग्ध प्रकल्प, दापचरी येथे दूध वाढीसाठी १ हेक्टर जागेवर घर, गोठा व अन्य सुविधासह १७० संलग्न पध्दतीची व १०० गावठाण पध्दतीची दुग्धव्यवसाय क्षेत्र उभारण्यात आली आहेत. अशा वितरीत करण्यात आलेल्या कृषिक्षेत्रावर काही दुग्धव्यवसाय क्षेत्रधारकांनी स्वत: अनधिकृतपणे शासनाची मान्यता न घेता दुग्धव्यवसाय क्षेत्रावर परस्पर बंगले बांधून त्यांचे रुपांतर फार्म हाऊस सारखे केले आहे, हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासनाने ठरवून दिलेल्या परवाना शुल्क दरमहा रु. ३०० व पुरविलेल्या सेवा-सुविधांची शुल्क वेळीच भरणे व करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन करुन शासनाची थकबाकी नियमित भरणे दुग्धव्यवसाय क्षेत्र धारकास बंधनकारक आहे. त्यानुसार दुग्धव्यवसाय क्षेत्र धारकांचे भाडे शासनाकडे जमा केले जात असून थकबाकीदाराकडून वसूलीची कार्यवाही सुध्दा सुरु आहे.
काही दुध क्षेत्र धारकांनी सदर ठिकाणी केलेले अनधिकृत स्विमिंग पुल, वाढीव बांधकाम व आर.सी.सी. बंगल्यांचे बांधकाम शासनाकडून निष्कासित करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त सदर ठिकाणाच्या इतर ५ दुग्ध व्यवसाय क्षेत्र धारकांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली असता संबंधीत ५ दुग्धव्यवसाय क्षेत्र धारकांनी मा. जिल्हा सत्र न्यायालय येथे दावे दाखल केले आहेत. त्यातील एका दाव्यात मा.न्यायालयाने खटला निकाली निघेपर्यंत पुढील कार्यवाही करण्यात मनाई केली असून उर्वरित प्रकरणी न्यायप्रविष्ठ आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई परिमंडळ अंतर्गत महावितरण कार्यालयांचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२४) ५१३२८ (२०-०४-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई परिमंडळअंतर्गत महावितरण कार्यालयांचे विभाजन करण्याच्या प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. महावितरण कंपनी अंतर्गत ही बाब असून कंपनीने वसई मंडळ कार्यालयाचे विभाजन करुन नवनिर्मित पालघर (लघु) मंडळ कार्यालय निर्माण केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महावितरणामध्ये ८ हजार कामगार विजेच्या कामाचा कोणताही अनुभव नसताना कार्यरत असल्याबाबत**

**(२५) ५१६२५ (२१-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरणामध्ये ८ हजार कामगार विजेच्या कामाचा कोणताही अनुभव नसताना कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामाचा अनुभव नसल्यामुळे ५०० कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला हे ही खरे काय,
(३) असल्यास, विद्युत अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) महावितरण कंपनी विद्युत सहाय्यकांना विद्युत अपघात टाळण्यासाठी प्रादेशिक केंद्र नाशिक, सांगली, अमरावती व औरंगाबाद येथे प्रशिक्षणाचे वर्ग नियमीतपणे घेते.
तसेच महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना वीज वाहिनीवर काम करत असताना होणारे अपघात टाळण्यासाठी खालील उपाय योजना केल्या आहेत -
i) एकाच पोलवर दोन्ही बाजूने झालेला वीज पुरवठा वेगळा करणे.
ii) अपवादात्मक ठिकाणी विद्युत पोलवर दोन्ही बाजूने होणारा विद्युत वेगळा करणे शक्य नसेल तर अशा ठिकाणी विद्युत खांबावर रंगाचे पट्टे (कलन कोड) देण्यात यावे.
iii) उपकेंद्रातील सर्व उपकरणे, टेक ऑफ स्ट्रक्चर फोर पोल स्ट्रक्चर, भूमिगत केबल्स, रिंगमेन युनीट, फिडर पिलर्स इत्यादी ठिकाणी नावाचे व स्पष्ट सूचना देणारे फलक लावणे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात मालमत्ता कार्डावर नियमबाहय नोंदी केल्याबाबत**

**(२६) ५१७९२ (२०-०४-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत अंधेरी (पश्चिम) येथील नगर भूमापन क्र.३७० मध्ये मालमत्ता कार्डावर नोंद करताना मूळ मालक व त्यांचे वारसदार व बांधकाम व्यावसायिक यांचे नावे असलेला फेरफार क्रमांक ३३८ प्रमाणे माहे ८ जुलै, २००८, रोजी वा त्या सुमारास एकाच दिवशी संबंधितांना कोणत्याही सूचना न देता नियमांचे उल्लंघन करुन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात नोंदी केल्याबाबतच्या तक्रारी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे २०१५ व फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने नियमबाह्य नोंदी करणाऱ्यां संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) नगर भूमापन अंधेरी, ता.अंधेरी येथील नगर भूमापन क्र. ३७० ही मिळकत सन १९६१ पासून श्रीबच्चूभाई सोमेवर दवे व श्रीमती मधुकांता दवे यांच्या नावे दाखले होती. श्री.बच्चूभाई दवे यांच्या १९७३ साली व श्रीमती मधुकांता दवे यांचे १९६७ साली निधन झाले. त्यांचे र्पामि वारस व प्रथम वारसांपैकी मृत झालेल्यांचे पुढील वारस यांनी दिनांक ०९.०६.२००८ च्या नोंदणीकृत दस्तान्वये सदर मिळकत मेसर्स फझल कन्स्ट्रक्शन यांना विक्री केली. मेसर्स फझल कन्स्ट्रक्शनच्या वतीने दिनांक १७.०६.२००८ रोजी प्राप्त अर्जान्वये सादर मिळकतीच्या अधिकार अभिलेखात नाव दाखल करण्याची विनंती करण्यात आली. तसेच श्री.बच्चूभाई दवे यांचे वारसांपैकी एक वारस श्री.दिलीप बच्चूभाई दवे यांनी सर्व वारसांच्या दिनांक १६.०६.२००८ च्या नोटराईजड् क्षतिपूर्ती बंधपत्र तथा घोषणापत्राच्या आधारे वारस नोंदीने नाव दाखल करणेकरीता नगर भूमापन कार्यालय, अंधेरी येथे दि.१९.०६.२००८ रोजी समक्ष जबाब दिलेला आहे.

त्यानुषंगाने सदर कार्यालयाकडून फेरफार क्रमांक ३३८, दि.१९.०६.२००८ नोदवून सर्व संबंधितांना वारस / खरेदीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतूदी नुसार नमुना नं.९ ची नोटीस देण्यात आली. सदर फेरफार नोंदीबाबत कोणाचीही हरकत प्राप्त झाली नाही. त्यानुसार नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांनी दि.०८.०७.२००८ च्या आदेशान्वये फेरफार क्र.३३८ मंजूर केला. सदर फेरफारान्वये मिळकत पत्रिकेवर श्री.बच्चूभाई दवे यांच्या प्रथम वारसांची नावे दाखल करण्यात आली व नंतर त्यापैकी जे वारस ह्यात नाहीत त्यांची नावे कमी करुन त्यांच्या पुढील ह्यात वारसांची नावे दाखल करण्यात आली. तद्नंतर त्यांच फेरफारान्वये सदर वरारसांची नावे कमी करुन दस्त क्रमांक ४/४८९५/०८, दि.९.०६.२००८ च्या आधारे मेसर्स फझल कन्स्ट्रक्शन यांचे नाव “धारक सदरी” दाखल करण्यत आले व त्याबाबत अर्जदार यांना दि.०८.०७.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सन २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ दरम्यान सदर नोंदीबाबत नगरभूमापन अधिकारी, अंधेरी अथवा जमाबंदी आयुक्त (ना.भू.), पुणे कार्यालयाकडे कोणतीही हरकत अर्ज प्रापत झालेली नाही.

मात्र, सदर मिळकतीबाबत श्री.प्रशांत संघवी यांनी दि.०२.०३.२०१६ रोजी तक्रार उपस्थित केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त फेरफार क्र ३३८ नुसार झालेली कार्यवाह नियमांतर्गत असल्याबाबत अर्जदार श्री.संघवी यांना नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांनी दि.२२.०३.२०१६ पत्रान्वये तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाने दि.२७.०४.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

---

**शासकीय भूखंड वाटपाचे जुने धोरण रद्द करुन नवीन धोरणाच्या नुसार भूखंड वाटपाचे धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(२७) ५१८८९ (२०-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने शासकीय भूखंड वाटपाचे जुने धोरण रद्द करुन नवीन धोरणाच्या नुसार भूखंड वाटपाचे धोरण स्वीकारण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन धोरणाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार सवलतीच्या दराने शासकीय जमीन प्रदान करण्याबाबत सुधारित निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यात ऑनलाईन फेरफार योजना कार्यान्वित झाल्याबाबत**

**(२८) ५२५२३ (२०-०४-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ पासून राज्यात ऑनलाईन फेरफार योजना कार्यान्वित झाल्या पासून तहसील स्तरावर एक नायब तहसिलदार, एक मंडळ अधिकारी व तलाठी यांची नेमणूक करण्यात येऊनही मोठ्या प्रमाणावर राज्यात विषेशत: नांदेड जिल्ह्यात दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६ या कालावधीत ऑनलाईन फेरफार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास आर्थिक गैरव्यवहारांना संधी मिळावी यासाठी ऑनलाईन फेरफार होऊ नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनकडून प्रयत्न केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने ऑन लाईन फेरफार होऊ न देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनव कोणती कारवाई  केली आहे वा करण्यात येत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०९-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) नांदेड जिल्ह्यातील एकूण सर्व १६ तालुक्यांचा अधिकार अभिलेखाचा डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आला असून सर्व १६ तालुक्यांमध्ये ऑनलाईन ई-फेरफार नोंदविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

अधिकारी अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे संपूर्ण संगणकीकरण करुन ई-फेरफार आज्ञावलीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्यास शासनाने दि.२३.१.२०१३ रोजी निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने यासंदर्भात ई-फेरफार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील येणाऱ्या अडचणी विचारात घेवून राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राकडून "ई-फेरफार आज्ञावली व्हर्जन-२" विकसित करुन ती वापरास उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच यासंदर्भातील अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी उपविभागीय तसेच जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्री व डाटा कन्वहर्जनच्या आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याकरीता महसूल व वन विभागाच्या दि.०७ मे, २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये "एडीट मोट्युल (Edit Module)" उपलब्ध करुन देण्यात आले असून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मधील तपशील हस्तलिखित गा.न.नं.७/१२ प्रमाणे तंतोतंत जुळविण्याची कार्यवाही अविलंब करण्याच्या सूचनाही सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

दरम्यानच्या काळात, खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना आवश्यक असल्यास, केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनाकरीता एक विशेष बाब म्हणून दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत हस्तलिखित अधिकार अभिलेखावरुन गा.न.नं. ७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदान करण्यात आली होती. तसेच जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत अशा  भागात मंडळ स्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह "ई-फेरफार वर्कस्टेशन्स" स्थापन करण्याच्या सूचनाही सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

ई-फेरफार कार्यक्रमासाठी शासनाने स्टेट डाटा सेंटरवर अधिकचे स्टोरेज उपलब्ध करुन दिले आहे. "ई-फेरफार" प्रणालीच्या अंमलबजावणीतील बहुतांश अडचणी तांत्रिक कारणांमुळे उद्‌भवलेल्या होत्या व वरील उपाययोजनांमुळे त्यातील बहुतांश अडचणींचे निराकरण झाले आहे.

___

### राज्यात ऑनलाईन सातबारा उतारे देण्याची घोषणा केल्याबाबत

**(२९) ५२८७५ (२१-०४-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सातबारा उतारे ऑनलाईन देण्याची घोषण करुनही सोलापूर जिल्ह्यात महसूल अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना संगणकाचे संपूर्ण ज्ञान नसल्याने ऑनलाईन सातबारा उतारे शेतकऱ्यांना मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाममार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना ऑनलाईन सातबारा उतारे ऑनलाईन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पर्ससीननेटद्वारे होणाऱ्या मच्छीमारीवर निर्बंध घातल्याबाबत

**(३०) ५३०३७ (२१-०४-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (जि.रत्नागिरी) शासनाने पर्ससीननेट द्वारे होणाऱ्या मच्छीमारीवर निर्बंध घातल्यामुळे स्थानिक मच्छीमार, व्यवसायिक यांचे रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक मच्छीमार, व्यवसायिक व त्यावर अवलंबून असलेले अन्य व्यवसायिकांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची बंदी उठवून मच्छीमारीचा कालावधी वाढविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०७-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) पर्ससीन मासेमारी व तिच्या राज्याच्या किनाऱ्यावरील पारंपारिक मासेमारी व त्यावर अवलंबून असलेल्या मासेमार व पर्यावरणावर होणारा परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी डॉ. कै. व्ही.एस. सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ५.२.२०१६ च्या अधिसूचनेत काही निर्बंधासह पर्ससीन नेटद्वारे मासेमार करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. भविष्यातील शाश्वत मासेमारी व पारंपारिक मच्छिमारांचे हित लक्षात घेऊन सदर निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व पालघर जिल्ह्यातील पशुपालकांसाठी राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेअंतर्गत जनावरांना मिळणाऱ्या विमा संरक्षणा बाबत**

**(३१) ५३०५८ (२१-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील पशुपालकांसाठी राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेअंतर्गत जनावरांना मिळणाऱ्या विमा संरक्षणापासून शेतकरी वंचित असल्याचे माहे मार्च, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना ही १ डिसेंबर, २०१५ ते ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत असून यांमध्ये ठाणे व पालघर जिल्ह्यातील ५००० पशुधन घटकांना विमा संरक्षण देणे अपेक्षित असतांनाही अद्यापही विमा संरक्षणाचा लाभ देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये ठाणे व पालघर जिल्ह्यात अनुक्रमे ७५० व ६९१ असे एकूण १४४१ जनावरांचा विमा उतरविण्यासाठी प्राप्त अर्जापैकी ठाणे जिल्ह्यातील ३५८ व पालघर जिल्ह्यातील २९६ अशा एकूण ६५४ जनावरांचा विमा उतरविण्यात आलेला आहे. सदरची योजना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये चालू राहणार असल्यामुळे प्राप्त अर्जधारक पशुपालकांच्या जनावरांचा विमा उतरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हा-मावळ तालुक्यातील जमीन खरेदी-विक्रीच्या माध्यमातून तळेगाव व वडगाव दुय्यम निबंधक कार्यालयातून सरकारकडे ११५ कोटींचा निधी जमा झाल्याबाबत**

**(३२) ५३०९१ (२१-०४-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा- मावळ तालुक्यातील जमीन खरेदी-विक्रीच्या माध्यमातून तळेगाव व वडगाव दुय्यम निबंधक कार्यालयातून सरकारकडे ११५ कोटींचा निधी जमा झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही कार्यालयाला सरकारची जागा नसून, भाड्याच्या जागेत कार्यालय असल्याने तेथे सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने जूनी कागदपत्रे शोधण्यास वेळ वाया जात असल्याने त्याचा नाहक त्रास नागरीकांना सहन करावा लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सरकारी कार्यालय शासनाच्या जागेत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे. शासकीय जागा अपुरी असल्याने शासनाने ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे प्रत्येक कार्यालयास २००० चौरस फुट याप्रमाणे जागा भाड्याने घेतलेला आहेत ही वस्तुस्थिती आहे.

दुय्यम निबंधक, मावळ या कार्यालयासाठी प्रस्तावित नविन प्रशासकीय इमारतीमध्ये जागा मागणी करण्यात आालेली आहे. तसेच दुय्यम निबंधक, मावळ क्र. २ या कार्यालयासाठी मा. मुख्याधिकारी, तळेगांव दाभाडे नगरपरिषद यांना मोकळया भूखंडाच्या मागणीचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे सदर दोन्ही कार्यालयांना शासकीय जागा उपलब्ध होणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दलित, आदिवासी, भूमिहीन शेतमजूर आदींचे केलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत

**(३३) ५३१४० (२१-०४-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या आदेशात दलित, आदिवासी, भूमिहीन शेतमजूर यांनी आदींचे केलेले अतिक्रमण काढू नये असे स्पष्ट निर्देश असतानाही राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी केलेले अतिक्रमण काढण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे राज्यातील लाखो भुमिहीन बेघर झाले असल्याचे श्रावणबाळ मात-पिता सेवा संघाने मा.महसूल मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१६) :**(१) शासन निर्णय क्र. एलईएन-१०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दि.२८/११/१९९१ नुसार शासकीय पड व गायरात जमिनीवर दि.०१/०४/१९७८ ते १४.४.१९९० या कालावधीमध्ये मागासवर्गीय आणि इतर भूमिहीन व्यक्तीची शेतीसाठी झालेली व दि.१४.४.१९९० रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे काही अटी व शर्तीवर नियमानुकूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) श्रावणबाळ माता-पिता सेवासंघ यांनी दि.५.२.२०१६ रोजीचे निवेदन तत्कालीन मा.मंत्री महसूल यांना दिले आहे हे खरे आहे. या निवेदनाच्या अनुषंगाने शासनपत्र दि.२९.२.२०१६ व २२.६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त यांना सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना देऊन अनुपालन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथे माहे एप्रिल व मे २०१६ या महिन्यामध्ये मुद्रांक पुरवठा उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(३४) ५४७३८ (१९-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.कल्याण, जि.ठाणे येथे माहे एप्रिल व मे २०१६ या महिन्यामध्ये मुद्रांक मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणावर शासकीय व निमशासकीय कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसील, कोर्ट व अनेक शासकीय, निमशासकीय कार्यालात मुद्रांक मिळण्यासाठी नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही मुद्राक मिळत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांची कामे प्रलंबित राहिली आहेत, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, मुद्रांक पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६) :**१) हे खरे नाही.

(२) पश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे व रायगड या जिल्ह्यांना जोडणाऱ्या मुरबाड-कर्जत या राष्ट्रीय महामार्गालगत अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामे होत असल्याबाबत**

**(३५) ५४९६२ (२४-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व रायगड या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या मुरबाड-कर्जत या राष्ट्रीय महामार्गालगत अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामे होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मुरबाड-कर्जत या राष्ट्रीय महामार्गालगत होत असलेली अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामे निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही
(२) प्रश्न उद्‌भवत नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**गोटखिंडी (ता.वाळवा, जि.सांगली) येथील गट नं.८ मधील शासकीय रस्ता वापरण्यास बंद केलेला पूर्ववत सुरू करण्याबाबत**

**(३६) ५५२४८ (१९-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.सुभाष रामचंद्र पाटील, रा.गोटखिंडी (ता.वाळवा, जि.सांगली) यांनी गोटखिंडी येथील गट नं.८ मधील शासकीय रस्ता वापरण्यास काही व्यक्तींनी बंदी केल्याबाबत तहसीलदार, वाळवा - इस्लामपूर, जि.सांगली यांच्याकडे दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६)** :(१) व (२) श्री.सुभाष रामचंद्र पाटील यांचा उक्त विषयाचा अर्ज तहसिलदार, वाळवा-इस्लामपूर यांच्याकडे दिनांक ०३.१२.२०१५ रोजी प्राप्त झाला असून त्यानुषंगाने मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ अन्वये दावा दाखल झाला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरात तयार करण्यात आलेल्या बगीच्यांची दुरावस्था झाली असल्याबाबत**

**(३७) ५५७५३ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील विकासकामांची जबाबदारी असलेल्या येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरात लाखो रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या बगिच्यांची दुरावस्था झाली असून व्यवस्थापनासाठी खर्चाची तरतूद नसल्याच्या नावाखाली हे बगीचे ओस पडत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बगीच्यात जंगली वनस्पती व गवत बोकाळले असून संबंधित अधिकाऱ्यांनी या बगींच्याकडे लक्ष देऊन बगीचा सुशोभित करुन पर्यावरण संतुलनाला हातभार लावावा अशी मागणी येथील नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही अचलपूर (जि.अमरावती) तालुक्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरातील बगीच्याची योग्य देखभाल नियमितपणे करण्यात येत असून बगीच्यामध्ये कोणतीही लंगली वनस्पती व गवत वाढलेले नसून बगीच्यातील सर्व वृक्षांचे या विभागाकडून चांगल्याप्रकारे संवर्धन करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र पशुधन विकास मंडळातर्फे व केंद्र शासनातर्फे पशुधन विमा योजना राबविण्याबाबत**

**(३८) ५५७९८ (१२-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र पशुधन विकास मंडळातर्फे व केंद्र शासनातर्फे पशुधन विमा योजना राबवून प्रत्येक जिल्ह्यासाठी ५ हजार जनावरांचा विमा काढण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळयासह राज्यातील जनावरांचा विमा तात्काळ काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०१-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पुशधन विका योजना राज्यात सन २०१५-१६ पासुन राबविण्यात येत आहे. सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी दि.०१.०८.२०१६ ते दि.१५.०८.२०१६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यामध्ये पशुधन विमा पंधरवडा राबविण्यात आला. सदर योजनेच्या प्रसिध्दी व प्रचारासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांना महराष्ट्र पशुधन विकास मंडळ या अंमलबजावणी यंत्रणेकडून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच, न्यु इंडीया एश्युरन्स कंपनीच्या स्तरावरुन देखील योजनेची प्रसिध्दी करण्यात येत आहे. याचाच परिणाम म्हणून धुळे जिल्ह्यात प्रागतिक एकूण २,१४० जनावरांचा व राज्यात दि.१५.०८.२०१६ पर्यंत प्रागतिक १,२६,९१७ जनावरांचा विमा उतरविण्यात आलेला आहे. सदरची योजना केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होण्याच्या अधीन राहून राज्यात यापुढे देखील राबविण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### साक्री (जि.धुळे) तालुक्यातील शिवाजीनगर येथे नव्याने ५० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा विस्तारीकरणाच्या कामाला मंजुरी देण्याबाबत

**(३९) ५६१८८ (१६-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील शिवाजीनगर येथे नव्याने ५० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा विस्तारी करणाच्या कामाला मंजुरी देण्याचे आश्वासन मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.ऊर्जा मंत्री महादयांनी केलेल्या आश्वासनाची पुर्तता अदयाप करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सौरऊर्जा प्रकल्पाच्या विस्ताराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात यावा,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

२५ मे.वॅ. प्रकल्पाचे काम प्रस्तावित आहे.

(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाशी, भाईंदर, डोंबिवली, भिंवडी (ग्रामीण) हे नवीन तालुके स्थापन करण्याबाबत**

**(४०) ५६३६५ (१९-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाशी, भाईंदर, डोंबिवली, भिंवडी (ग्रामीण) हे नवीन तालुके स्थापन करण्याची कार्यवाही कोकण विभागीय आयुक्त स्तरावर केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने वाढत्या प्रशासकीय ताणाचा विचार करता सदरचे तालुके स्थापन करण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करुन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१६) :**(१), (२), (३) व (४) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १५.११.२०११ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांचे सविस्तर अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका विभाजनाचे निकष निश्चित करुन प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत गुणवत्तेनुसार उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

**चिपळून (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोफळी येथील वीजनिर्मिती कंपनीने प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यासंदर्भात दुर्लक्ष करीत असल्याबाबत**

**(४१) ५६४३८ (१६-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळून तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पोफळी येथील वीजनिर्मिती कंपनीने प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यासंदर्भात दुर्लक्ष केले जात असल्याच्या निषेधार्थ प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ०१ मे, २०१६ पासून कंपनीच्या कार्यालयासमोर उपोषण करुन आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पोफळी प्रकल्पग्रस्तांना लवकरात लवकर नोकऱ्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आह वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) बाबत, मानिर्मिती कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थी यांनी NCTVT उत्तीर्ण झाल्यानंतर त्याना महानिर्मिती कंपनीमार्फत प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुषंगाने २८ प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थी यांना माहनिर्मिती कंपनीच्या पोफळी आस्थापनेअंतर्गत प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खाजगी व सहकारी संस्थानी एकत्र येऊन दूधाचे दर निश्चित करण्याबाबत**

**(४२) ५६४८० (१२-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांतील पोषण आहारात दुधाचा व दुग्धजन्य पदार्थाचा दिनांक १ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास समावेश करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये खाजगी व सहकारी दुध संस्थांचे दुध दर वेगवेगळे आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी व सहकारी संस्थांनी एकत्र येवून दुधाचे दर निश्चीत करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर : (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) जीवनावश्यक वस्तुंचे दर जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ च्या तरतुदीनुसार निश्चित करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. केंद्र शासनाने दुधासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित केलेली नाही. दुधासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करावी अशी विनंती राज्य शासनाने केंद्र शासनास दि.१९/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. तथापि सहकारी दुध संघ/संस्थांनी दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुध खरेदीसाठी शासनाने शासकीय दुधाकरिता निश्चित केलेला खरेदीदर द्यावा असे निर्देश दि.१०/०७/१५ रोजी निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किल्लारी भूकंपग्रस्तांना कायमची सरकारी नोकरी देतांना आपल्या मर्जीप्रमाणे भरतीप्रक्रिया राबविणाऱ्या राज्यातील सहाही विभागीय दुग्धविकास अधिकाऱ्यांना निलंबित केल्याबाबत**

**(४३) ५६६९५ (१२-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किल्लारी भूकंपग्रस्तांना कायमची सरकारी नोकरी देतांना आपल्या मर्जीप्रमाणे भरतीप्रक्रिया राबविणाऱ्या राज्यातील सहाही विभागीय दुग्धविकास अधिकाऱ्यांना माहे डिसेंबर, २०१५ रोजी च्या सुमारास निलंबित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निलंबित केलेल्या दुग्धविकास अधिकाऱ्यांनवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे,

(३) तसेच केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. औरंगाबाद/नाशिक विभागातील नोकरभरती/पदोन्नती मधील अनियमितते प्रकरणी सहा अधिकारी/कर्मचाऱ्यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निलंबित केले होते. यापैकी चार अधिकारी/कर्मचारी औरंगाबाद प्रादेशिक विभागातील असून एक अधिकारी नाशिक विभागातील आणि एक अधिकारी आयुक्त (दुग्ध) कार्यालयातील होते. त्यानंतर ६ कर्मचाऱ्यांपैकी तीन अधिकारी निलंबाधीन असताना सेवानिवृत्त झाले असून शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.निप्रआ-११११/प्र.क्र.८६/११-अ, दि.१४.१०.२०११ मधील तरतुदींच्या अनुषंगाने उर्वरित ३ निलंबित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रकरणाचा आढावा घेऊन माहे जुलै, २०१६ मध्ये त्यांना पुन:स्थापित करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(२) निलंबित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नसून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर दोषारोप बजावण्यात आले असून त्यानुषंगाने विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील तहसील कार्यालयातुन मिळणाऱ्या विविध प्रमाणपत्राची अडवणुक होत असल्याच्या तक्रारीबाबत**

**(४४) ५८०१२ (१९-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील तहसील कार्यालयातुन मिळणाऱ्या विविध प्रमाणपत्राची अडवणुक होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांनी सर्व कागदपत्रांसह मागणीचा अर्ज दाखल करुन सुद्धा त्यात बऱ्याच उणीवा हेतुपुरस्पर कार्यालयातील कर्मचाऱ्यांद्वारे काढल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरीकांनी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांना निर्धारीत मुदतीत तहसील कार्यालयातुन रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, शिधापत्रिका मिळणे क्रमप्राप्त असतांना त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नसल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरीकांची गैरसोय टाळण्याकरीता तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाची चौकशी करुन कडक कार्यवाही करण्यात येणार आहे काय वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करण्याची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१०-२०१६) :**(१), (२) व (३) अशा स्वरूपाच्या तक्रारी निदर्शनास आलेल्या नाहीत जिल्हा सेतू कार्यालय व नागपूर शहर सेतू कार्यालयातून रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणप्रत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तातडीने विहित मुदतीत निर्गमित करण्यात येतात,व नागरीकांना SMS द्वारे प्रमाणपत्राची माहिती उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे नागरीकांना वारंवार कार्यालयात यावे लागत नाही. याव्यतिरिक्त नागरीकांच्या व विद्यर्थ्यांच्या सोईकरीता शाळा/महाविद्यालयामध्ये व शहारातील विविध भागामध्ये शिबीरांचे आयोजन करून दाखल्यांचे वाटप करण्यात येते. तसेच महाराष्ट्र लेकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार विहित करण्यात आलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीमध्ये प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येत असल्यामुळे गैरसोय होत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात कोळशावर आधारित वीज प्रकल्पांमध्ये पाण्याचा बेसुमार उपसा होत असल्याबाबत**

**(४५) ५८२७९ (१६-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोळशावर आधारित सुरु असलेल्या वीज प्रकल्पामधून दरवर्षी जवळजवळ सव्वा कोटी जनतेचे पिण्याचे पाणी वापरले जाते अशी माहिती ग्रीनपीस इंटनॅशनल या संस्थेने माहे एप्रिल, २०१६ मध्ये प्रसिध्द केलेल्या आपल्या अहवालात म्हटले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोळशावर आधारित वीज प्रकल्पांमध्ये पाण्याचा बेसुमार उपसा होत असून त्याचा फटका राज्यातील दुष्काळग्रस्त भागाला बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१६) :**(१) सदर संस्थेने जागतिक अहवाल प्रसिध्द केल्याचे दिसून येते.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देशात सर्वाधिक उर्जानिर्मिती करणारे राज्य म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्य हे सौरउर्जानिर्मितीत मागे पडले असल्याबाबत**

**(४६) ५९४१८ (१६-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात सर्वाधिक उर्जानिर्मिती करणारे राज्य म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्य हे सौरउर्जानिर्मितीत मागे पडले असून देशात पाचव्या क्रमांकार असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य स्थितीत राज्य केवळ ९ टक्के ऊर्जानिर्मिती अपारंपारिक उर्जा स्त्रोतांद्वारे करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पारंपारिक उर्जा स्त्रोतांची असणारी मर्यादित उपलब्धता आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता सौर ऊर्जानिमिर्तीस सरकारने प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असल्याने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

राज्यात सौर ऊर्जेद्वारे ३६५.७५ मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प आहे जून, २०१६ अखेरपर्यंत कार्यान्वित झाले आहेत. तसेच सुमारे ५०० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीच्या मार्गावर आहेत.
(२) हे खरे आहे.

राज्यात वित्तवर्ष २०१५-१६ अखेर सुमारे ८.४ टक्के ऊर्जा निर्मिती अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांद्वारे करण्यात आली आहे.
(३) राज्य शासनाने अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याकरिता अपाऊ धोरण-२०१५, दिनांक २० जुलै, २०१५ रोजी जाहीर केले आहे. सदर धोरणांतर्गत ७५०० मे.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प सन २०१९-२० पर्यंत उभारावयाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

शिवाय, सदर धोरणाच्या अंमलबजावणीकरिता दि.९ सप्टेंबर, २०१५ अन्वये कार्यपध्दती निश्चित केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील भुसार आडत व्यापाऱ्यांना भाडेपट्टा करतांना थकीत असलेले मुद्रांक शुल्क व त्यावरचा दंड भरण्याबाबत दिलेली नाटीस**

**(४७) ६०२५७ (१९-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील भुसार आडत व्यापाऱ्यांना भाडेपट्टा करतांना थकीत असलेले मुद्रांक शुल्क व त्यावरचा दंड भरण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २९ मार्च, २०१६ पासून स्टॅम्प ॲक्ट ३३ ब, ३३ अ नुसार नोटीस देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३६.२५ ब प्रमाणे लावलेल्या मुद्रांक शुल्काची फेर आकारणी भरणे व कलम ३९ नुसार आकारलेल्या दंडाची रकमेची माफ करण्यासाठी नव्याने मार्गदर्शन तत्वे सुचवून अभय योजना जाहीर करण्यात यावी यासाठी भुसार आडत व्यापारी संघ, सोलापूर यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने आडत व्यापाऱ्यांची दंडाची रक्कम माफ करुन अभय योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर माहिती नोंदणी व मुद्रांक कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील धानोरा येथे २२० के.व्ही.उपकेंद्र उभारणीचे काम २०१५-१६ च्या एसटीयु मध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(४८) ६०२९९ (१६-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील धानोरा येथे २२० के.व्ही.उपकेंद्र उभारणीचे काम २०१५-१६ च्या एसटीयु मध्ये समाविष्ट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी व त्यानंतर वारंवार मा.उर्जामंत्र यांच्याकडे निवेदने देवूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे ही खेर आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने २२० के.व्ही. धानोरा येथे उपकेंद्र उभारणीबाबात तसेच १३२ के.व्ही अमळनेर-चोपडा डबल सर्किट करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१६) :**(१) महापारेषण कंपनीस निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) जळगाव जिल्ह्यातील यावल उपकेंद्रावर भविष्यात येणारा संभाव्य वीज भार लक्षात घेऊन धानोरा २२० के.व्ही. उपकेंद्राचा प्रस्ताव विचाराधीन होता. परंतु विरोदा, ता.यावल, जि.जळगाव येथे २२० के.व्ही. चे उपकेंद्रास मंजुरी मिळाल्यामुळे यावल व सावदा उपकेद्रावर भविष्यात येणारा वीज भार कमी होणार आहे. त्याचप्रमाणे अंमळनेर २२० के.व्ही. रोहित्रे व अंमळनेर-चोपडा व्दीपथ वाहिनी (१३२ के.व्ही.) उभारण्याची योजनाही मंजूर झालेली असल्यामुळे सद्यस्थितीत धानोरा येथे वेगळ्या अति उच्च दाब केंद्राची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर व हैद्राबादला जोडणारा हत्तुर ते बरळे हा बाह्यवळण रस्ता पूर्ण करण्याबाबत

**(४९) ६१३१२ (२४-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व हैद्राबादला जोडणाऱ्या हत्तुर ते बरळे ह्या २१ कि.मी. बाह्यवळण रस्त्याचा काही भाग माळढोक अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून जात असल्याने राष्ट्रीय वन्यजीवन मंडळाकडून मंजूरी मिळण्यास विलंब झाल्याने बाह्यवळण रस्त्याच्या बांधकामासाठी नव्याने निविदा काढण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, हत्तूर ते वरळे हा बाह्यवळण रस्ता किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) अद्याप, निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६) :**(१) होय

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) नवीन दरसूची व सध्याची आय.आर.सी.मानके यानुसार सुधारीत प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या दिल्ली येथील मुख्यालयात छाननीस्तरावर आहे,असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

---

**सातारा येथे मुद्रांक विक्रेत्यांच्या केलेल्या तपासणीत त्रुटी आढळूनही जिल्हासह निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी याच्याकडून कारवाई होत नसल्याबाबत**

**(५०) ६१३८० (१९-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील मुद्रांक विक्रेत्यांच्या केलेल्या तपासणीत त्रुटी आढळूनही जिल्हासह निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी याच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे माहे मे, २०१६ रोजी च्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवान्यांच्या नुतनीकरण करुनही मुद्रांकाची विक्री केली जात नसल्याने लोकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने मुद्रांक विक्रेत्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.